**गवती चहा**

***Cymbopogon citratus*** (DC.) Stapf. Family. **– Poaceae**

**विविध भाषांमधील नावे:**

संस्कृत:सुगंधी भूस्त्रींना; मराठी:गवती चहा; हिंदी:गन्धत्रीना; तामिळ: कारुप्पूरपूल





**Morphology:**

Perennial herbs. Culms terete, tufted. Leaves linear-lanceolate, narrowed at base, glaucous. Panicles lax. Sessile spikelets linear-lanceolate.

**वनस्पतीचे वर्णन:**

गवती चहा हे भारतात सर्वत्र लावले जाणारे सुगंधी गावात पीक आहे. ही वनस्पती कुंडीमध्ये लावूनसुद्धा त्याचा दैनंदिन जीवनामध्ये वापर केला जातो. ही गवतवर्गीय वनस्पती एक मीटर पर्यंत वाढते. खोडावर खरखरीत पृष्ठभाग असणारी पाने असतात. जगभरातील गवती चहा तेल उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन भारतमध्ये होते. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये निर्यात करण्यात भारत अग्रेसर आहे. पूर्वभारतातील गवती चहा मध्ये तेलाचे प्रमाण अधिक असते.

**बहर येण्याचा कालावधी :** मार्च आणि एप्रिल

**औषधी उपयोग:**

या वनस्पतीच्या पानांच्या उर्ध्वपातन पद्धतीने तेल काढले जाते. या तेलामध्ये सिट्राल असल्यामुळे जीवनसत्व ए तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्याचबरोबर आयोनिन, मिथाईल आयोनोन, जिरॅनिऑल, नेरॉल इ. घटकांमुळे अत्तर कारखान्यांमध्ये हे तेल वापरले जाते तापामध्ये घाम येण्यासाठी पोटदुखी, सर्दी, पडसे, थंडीताप इ. आजारांवर याचा भरपूर प्रमाणात उपयोग केला जातो.

**लागवड:**

याची लागवड दोन पद्धतीने केली जाते. बियांपासून गादी वाफ्यावरती रोपे तयार केली जातात व नंतर ती शेतामध्ये लावली जातात. साधारणपणे जून महिन्यामध्ये या प्रकारे लाडवाड केली जाते. या पिकाची लागवड करण्यासाठी सहसा ठोंबांचा वापर केला जातो. मूळच्या पूर्णवाढ झालेल्या वनस्पतीच्या ठोंबांपासून रोपे तयार करून सतत व नियमित पाणी असेल अश्या जागी लावली जातात. साधारणपणे ३-४ महिन्यात याचे उत्पन्न घेता येते.